आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

८ ऑक्टोबर २०२५ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- नवी मुंबई विमानतळ, मेट्रो ३ चा अखेरचा टप्पा, आणि मुंबई १ ॲपचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण

- नवी मुंबई विमानतळामुळे राज्याच्या जीडीपीत १ टक्के वाढ होईल, असा मुख्यमंत्र्यांना विश्वास, पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी मदत देण्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं केंद्र सरकारला आवाहन

- ओबीसी विद्यार्थ्यांसाठीच्या वसतीगृहासाठी जलद गतीनं जमीन अधिग्रहित करण्याचे महसूल मंत्र्यांचे आदेश

आणि

- ब्रिटनचे प्रधानमंत्री कीर स्टार्मर यांच्याकडून मुंबईत विविध उद्योजकांशी चर्चा

**<><><><>**

लोकांचं आयुष्य सुकर करण्यासाठी सरकार पायाभूत सुविधांवर मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत असल्याची माहिती प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज दिली. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई मेट्रो ३ चा आचार्य अत्रे चौक ते कफ परेड दरम्यानचा अखेरचा टप्पा, तिकिट काढण्यासाठीचं मुंबई वन हे ॲप आणि आयटीआयमधल्या अल्पकालीन अभ्यासक्रमांचा प्रारंभ प्रधानमंत्र्यांनी आज नवी मुंबईतून केला. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

***- - -होल्ड कॅप्सूल - -***

*(८ वर्षांपूर्वी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भूमीपूजन केलेल्या नवी मुंबई विमानतळाचं उद्घाटन आज त्यांच्याच हस्ते झालं. डिसेंबरपासून इथून उड्डाणं सुरू होतील. यामुळं २ आंतरराष्ट्रीय विमानतळ असलेलं मुंबई हे देशातलं पहिलं महानगर झालं आहे. या विमानतळामुळं उद्योग धंद्याला चालना मिळेल, कृषी मालाला भाव मिळेल असं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले.*

***- - होल्ड प्रधानमंत्री - -***

*यावेळी प्रधानमंत्र्यांनी लोकनेते दि. बा. पाटील यांचं कार्य प्रेरणादायी असल्याचे गौरवोद्गार काढले. भूमीगत मेट्रोच्या कामात अडथळे आणल्याबद्दल त्यांनी नाव न घेता महाविकास आघाडी सरकारवर टीका केली. २६-११ च्या मुंबई हल्ल्यानंतर पाकिस्तानवर हल्ला करण्यासंदर्भातल्या माजी गृहमंत्री पी. चिदंबरम यांच्या वक्तव्याचा संदर्भ देत त्यांनी काँग्रेसवरही टीका केली.*

https://x.com/ddsahyadrinews/status/1975883604627533868

*(1.19 TO 1.39)*

*जीएसटीच्या दरकपातीमुळं यंदाच्या नवरात्रीमध्ये खरेदीचे विक्रम तुटले. त्यामुळं स्वदेशीवर जोर देण्याचं आवाहन प्रधानमंत्र्यांनी उपस्थितांना पुन्हा एकदा केलं.*

*हा विमानतळ देश आणि राज्याच्या विकासात महत्त्वाची भूमिका निभावेल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यावेळी म्हणाले.*

- ***- -होल्ड मुख्यमंत्री बाइट १.४३-१.५३ आणि २.०१ - २.१३ - -***

https://x.com/airnews_mumbai/status/1975883442744438989

*या विमानतळाच्या परिसरात तिसरी मुंबई आणि वाढवण परिसरात चौथी मुंबई उभारली जात असल्याचं त्यांनी सांगितलं. वाढवण विमानतळ हे समुद्र किनाऱ्यावरचं देशातलं पहिलंच विमानतळ असेल. तसंच मुंबई मेट्रो ३ ही देशातली सर्वाधिक लांबीची मेट्रो असल्याचा उल्लेख मुख्यमंत्र्यांची या भाषणात केला.*

*प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या विमानतळाचं भूमीपूजन केलं होतं याची आठवण उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी काढली. तर पूरग्रस्त शेतकऱ्यांना केंद्र सरकारनं मदत द्यावी असं आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलं.*

- ***- -होल्ड - बाइट उपमुख्यमंत्री अजित पवार - (0.00 to 0.33)- -***

https://x.com/airnews_mumbai/status/1975889782736900136

*या विमानतळामुळं देशातली अनेक ठिकाण मुंबई आणि नवी मुंबईशी जोडली जातील. वर्षाला ९ कोटी प्रवाशांची वाहतूक करण्याची क्षमता असलेलं हे विमानतळ २ लाख रोजगार निर्माण करेल, असा विश्वास केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्री राम मोहन नायडू यांनी व्यक्त केला. येत्या २० वर्षात २ हजार नवीन विमानतळं उभारली जाणार आहेत. त्यात वाढवण विमानतळाचाही समावेश आहे, असं त्यांनी सांगितलं.*

*राज्यपाल आचार्य देवव्रत, केंद्रीय मंत्री रामदास आठवले आणि मुरलीधर मोहोळ यांच्यासह विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते.)*

**<><><><>**

पूरग्रस्त भागातल्या विद्यार्थ्यांचं परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय राज्य शासनानं घेतला आहे, यासोबतच शैक्षणिक संस्थांनीही सामाजिक जबाबदारी म्हणून विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी पुढाकार घ्यावा, असं आवाहन उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केलं आहे. ते आज मंत्रालयात पूरग्रस्त भागातल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणींचा आढावा घेण्यासाठी आयोजित  बैठकीत बोलत होते.

**<><><><>**

पीककर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांकडून व्याज वसुली करू नका असे निर्देश सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी आज मंत्रालयात झालेल्या बैठकीत दिले.

**<><><><>**

ओबीसी समाजातल्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यात वसतिगृह, कार्यालय आणि अभ्यासिका उभारण्यासाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना तातडीनं कार्यवाही करून जागा निश्चित करण्याचे निर्देश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. यासंदर्भात आज मंत्रालयात बावनकुळे यांच्या दालनात बैठक झाली. या बैठकीत अनेक जिल्ह्यांमधल्या जागा निश्चितीच्या प्रक्रियेला अंतिम स्वरूप देण्यात आलं. ज्या जिल्ह्यांमध्ये जागा अद्याप निश्चित केलेली नाही, त्यांनी तातडीनं योग्य जागा निश्चित करून प्रस्ताव सादर करावेत, जिल्ह्याधिकाऱ्यांनी जमीन हस्तांतरण प्रक्रियेसाठी मोजणी शुल्क माफ करावं, अशा सूचना बावनकुळे यांनी यावेळी दिल्या.

**<><><><>**

ब्रिटनचे प्रधानमंत्री कीर स्टार्मर आजपासून दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर असून आज मुंबईत त्यांनी आणि त्यांच्यासोबतच्या व्यापारी शिष्टमंडळानं आज मुंबईत देशातल्या विविध उद्योजकांची भेट घेतली. या दौऱ्याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**-   - - होल्ड व्हाइस कास्ट  - - -**

*(भारत आणि ब्रिटन मुक्त व्यापार करार हा युरोपियन महासंघातून बाहेर पडल्यानंतर ब्रिटनने स्वाक्षरी केलेला सर्वात मोठा करार असल्याचं ब्रिटनचे प्रधानमंत्री कीर स्टार्मर आज मुंबईत उद्योजकांना संबोधित करताना म्हणाले.  स्टार्मर यांनी आज यशराज फिल्म्स स्टुडिओलाही आज भेट दिली. पुढच्या वर्षी यशराज फिल्म्सच्या ३ चित्रपटांचं ब्रिटनमध्ये छायाचित्रण होणार आहे. यामुळं ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेत लाखो पौंडांची भर पडेल आणि ३ हजार रोजगार निर्माण होतील, असं स्टार्मर म्हणाले.*

*राज्यपाल आचार्य देवव्रत आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी त्यांचं सकाळी विमानतळावर स्वागत केलं. पहिल्यांदाच भारत दौऱ्यावर आलेल्या स्टार्मर यांच्यासोबत ब्रिटनमधल्या सव्वाशे उद्योजकांचं आतापर्यंतच सर्वात मोठं शिष्टमंडळ आहे. व्यवसाय सुलभतेच्या धोरणातून गुंतवणूकदारांच्या समस्या लवकर सोडवण्याचं राज्य सरकारचं धोरण असल्याचं मुख्यमंत्र्यांनी ब्रिटीश शिष्टमंडळाला सांगितलं. उद्योजकांसाठी सरकारनं केलेल्या विविध उपाययोजनांची माहिती त्यांनी दिली.*

*प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासोबत स्टार्मर उद्या मुंबईतल्या राजभवनात द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. त्यानंतर दोन्ही नेते ग्लोबल फिनटेक फेस्टमध्ये सहभागी होतील आणि उद्योजकांशी चर्चा करतील.)*

**<><><><>**

शिवसेना पक्षाचं नाव आणि निवडणूक चिन्हासंदर्भात उद्धव ठाकरे यांच्या याचिकेवर आता येत्या १२ नोव्हेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जानेवारीपर्यंत होणार असून त्यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी घ्यावी, अशी विनंती ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी ठाकरे यांच्या वतीनं आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी दरम्यान केली होती.

**<><><><>**

पुणे महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी, तसंच शिक्षण मंडळाकडील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना यंदाच्या दिवाळीनिमित्त ८ पूर्णांक ३३ शतांश टक्के बोनस जाहीर झाला आहे. सप्टेंबर महिन्याच्या वेतनाबरोबर बोनस दिला जाणार आहे.  विविध विभागांत कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यांनाही पहिल्यांदाच दिवाळीनिमित्त पाच हजार रुपयांचा बोनस जाहीर झाला आहे.

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
८ ऑक्टोबर २०२५ - बुधवार

**<><><><>**

नाशिक शहरातील सातपूर इथं महादेववाडीत डिझेलचा भडका उडाल्यानं पाच जण गंभीर जखमी झाले. आज दुपारी झालेल्या या दुर्घटनेत  दीड वर्षांचा मुलगा जखमी झाला असून त्याची प्रकृती चिंताजनक आहे.

**<><><><>**

अंमली पदार्थ तस्करीच्या एका प्रकरणात ईडीच्या पथकानं आज  मुंबईत आठ ठिकाणी छापे टाकले. फैझल जावेद शेख आणि अल्फिया शेख यांच्यासह इतरांवर हे छापे टाकल्याचं वृत्त आहे.

**<><><><>**

राज्यात ओला दुष्काळ जाहीर करावा, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना प्रति हेक्टर ५० हजार रुपये मदत द्यावी या मागणीसाठी आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं वाशिम आणि हिंगोली जिल्ह्यात कळमनुरी इथं आंदोलन केलं.

**<><><><>**

गेल्या २४ तासात कोकणात काही ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. येत्या दोन दिवसात राज्यातल्या चारही विभागांमध्ये तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**//<><><><>//**